# राष्ट्रीय मानव अधिकार आयोग

## जाहीर नोटिस

### सार्वजनिक व खाजगी आरोग्य क्षेत्रातील आरोग्यसेवेचा अधिकार यावर जनसुनवाई

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि जन स्वास्थ्य अभियान (सामाजिक संस्था-संघटनांचे नेटवर्क) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सहयोगाने, आरोग्य सेवेचा अधिकार या विषयावर दोन दिवसाच्या पश्चिम विभागीय जनसुनवाईचे आयोजन दि. १८, १९ नोव्हेंबर २०१५ रोजी मुंबई येथे करण्यात येत आहे.

जर शासकीय रुग्णालये /खाजगी रुग्णालये /सार्वजनिक पैशातून चालणाऱ्या आरोग्य विमा योजना/सरकारी-खाजगी भागीदारीतून चालणाऱ्या आरोग्य यंत्रणा यांच्याद्वारे व्यक्तींच्या/गटांच्या आरोग्यसेवेचे हक्क, रुग्ण हक्क डावलण्याच्या काही गंभीर घटना असतील, तर जनसुनवाईत असे मुद्दे राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे सदस्य व तज्ञ यांचे पॅनेल (शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत) सुनवाई करतील. आरोग्य व्यवस्थेच्या अभावामुळे, धोरणात्मक कारणांमुळे जर आरोग्य हक्कांचे उल्लंघन होत असेल तर अशा केसेससुद्धा मांडता येतील.

महाराष्ट्र राज्यांतील व्यक्ती/गट ज्यांच्या आरोग्य हक्कांचे गंभीर उल्लंघन झाले आहे, आणि जे या जनसुनवाईमध्ये सहभागी होवू इच्छितात, त्यांनी या जाहिरातीनंतर ३० दिवसांच्या आत संबंधीत माहितीसह जन आरोग्य अभियान, पोस्ट बॉक्स नं. १९३१, एक्स ऑफिसर्स कॉलनी, पोस्ट ऑफिस, कोथरुड,पुणे-३८ ; इ-मेल- janarogyaabhiyan@gmail.com, मो.नं. ९१६८९१७७८८ यावर संपर्क साधावा. छाननी नंतर योग्य आढळलेल्या व्यक्तींना आयोगापुढे साक्ष देण्यासाठी निमंत्रित केले जाईल.

अधिक माहितीसाठी www.nhrc.nic.in या वेबसाईटला भेट द्या.